# माजी आ.लक्ष्मण पवार यांनी पोसलेले अनेक ठेकेदार उघडकीस?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564





■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २३० ■ शुक्रवार दि.९ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 230 ■ Friday Dt.9 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# चकलांबा-गेवराई या रस्ता कामाची आ.विजयसिंह पंडितांनी केली पाहणी!

## ■ दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातमीचा इफेक्ट! आमदार ऑन द स्पॉट
## ■ रस्ता व नालीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे आले निदर्शनास?
## ■ पांढरवाडी पासून पुढे अजूनही रस्ता प्रलंबितच; नागरिक संतप्त?

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा ते गेवराई सुरू असलेल्या रस्त्याचे काम खूप संथगतीने चालू आहे. कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांसह इंजिनियर यांच्यावर कठोर कारवाई करावी याबाबत दैनिक महाराष्ट्र आरंभने सातत्याने आवाज उठवला होता. यासंदर्भात सविस्तर वृत्त दि.०५ मे रोजी प्रकाशित केलेल्या बातमीतून मोठा इफेक्ट झाल्याचा पाहायला मिळाला. गेवराई तालुक्याचे विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी प्रत्यक्ष सुरू असलेल्या रस्त्याची पाहणी करून ठेकेदारांना धारेवर धरले. कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांना कडक सूचना दिल्या. तसेच प्रलंबित असलेल्या पांढरवाडी ते गेवराई रखडलेल्या रस्त्याला लवकरच सुरुवात करावी अशी मागणी वाहन चालकांसह परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे.

हाय इम्युनिटी अंतर्गत मंजूर केलेल्या चकलांबात गेवराई हा रस्ता सदरील चुकीच्या कार्यपद्धतीमुळे मागील दोन ते तीन वर्षापासून अत्यंत कासव गतीने सुरू असून ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे या कामाला उशीर झाला



आरंभ — बीड जिल्हा — बुधवार दि.७ मे २०२५ — ४

माजी आ.लक्ष्मण पवारांच्या कार्यकिर्दीत सुरू केलेल्या चकलांबा-गेवराई रस्त्यांवर धुराळा?

रस्त्यावर धुराळा उडवत रंगला वाहनांचा थरार : वाहनचालकांची तारांबळ?

■ रस्त्यांच्या कामाचा कंपनीच्या ठेकेदाराकडून खेळखंडोबा?
■ रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य, वाहनचालकांसह नागरिक हैराण!
■ सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?

गेवराई । प्रतिनिधी

मागील तीन वर्षापासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा सुरू असलेल्या काम खूप संथ गतीने चालू आहे तरी सदरील विभागाने या कामात दिरंगाई करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी याबाबत सविस्तर वृत्त असे की असा की मागील तीन ते चार वर्षापासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनी खूपच धिम्या गतीने काम करत आहे व या कामाचा फटका या रोडवर असलेल्या गावांना खूप त्रास सहन करावा लागत आहे या धुळीच्या त्रासामुळे की त्यांनी कित्येक लोकांच्या आरोग्यावर खूप परिणाम होत आहे तरी माननीय बांधकाम विभागाने या कंपनीला लवकरात लवकर या रस्त्यांचे काम पूर्ण करावे व जनतेची होणारे हाल पहून पावसाळ्यापूर्वी सदरील काम कसे पूर्ण होईल याकडे विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे

कंपनीच्या हलगर्जीपणामुळे, माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर केलेल्या हाय युमुनिटी अंतर्गत मंजूर केलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनीच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे मागील तीन ते चार वर्षापासून अत्यंत धिम्या गतीने सुरू असून कंपनीच्या ठेकेदारामुळे या रस्त्याचे कासव गतीने सुरू आहे कंपनीच्या हलगर्जीपणामुळे या कामाला सातत्याने उशीर होत आहे. या कामातील जेमतेम पस्तीस टक्के काम पूर्ण झाले असून मात्र त्यांचा दर्जा समाधानकारक नाही रस्त्यावरील वाहतूक वाढत असल्याने आधीच या रस्त्याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यात भर म्हणून आता धुळीने नागरिकांना हैराण केले आहे. त्यामुळे या धुळीने स्थानिकांना श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर काहीतरी उपाय करणे आवश्यक आहे.

या रस्त्याला सतत गर्दी असते. शेतकरी बांधवाचे वाहने, बैलगाड्यांची ये-जा सुरुच असते. यामुळे ठिकठिकाणची धूळ आजूबाजूच्या घरांमध्ये पसरत आहे. वाहतुकीसाठी पूरक रस्ता कमी आणि खड्डेच जास्त अशी परिस्थिती आहे.येथित परिसरात शाळा असल्याने शालेय विद्यार्थ्यांचा वावर नेहमी असतो. त्यामुळे वाहनांमुळे उडणारी धूळ रस्त्यावरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह स्थानिकांना त्रासदायक बाब झाली आहे. आधीच त्रास आहेच. आता त्यात धुळीचीही भर पडली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत.

07 May 2025 - Page 4 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

असल्याचा नागरिकांतून बोलले जात आहे. हा रस्ता पावसाळ्याच्या पूर्वी पूर्ण होणं गरजेचं आहे. आमदार महोदय यांनी पाहणी केली असता या कामात मोठ्या प्रमाणात अनियमतता झाल्याचे आढळून आले, भ्रष्टाचार व निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने नागरिकांनी स्वतःहा आमदार महोदय यांना रस्ता दाखवून साहेब बघा या रस्त्याची ठेकेदारांनी वाट लावली असं सामान्य जनता बोलू लागली. पौळाचीवाडी, खळे गाव, माटे गाव, राजपिपरी पांढरवाडी येथील वाहन धारकांचे म्हणणे ऐकून घेतले ठेकेदाराला जॉब विचारून खडेबोल सोनावले.

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ e फेक्ट



# खांडवी तांडा येथे गावठी हातभट्टी दारू विकणाऱ्या महिलेवर कारवाई!

## गेवराई पोलिसांच्या कारवाईत २३९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; महिला अटक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलिसांनी खांडवी तांडा येथे हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर कारवाई केली आहे. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून हातभट्टी उद्धवस्त केली, तसेच दारू आणि रसायन नष्ट केले. या कारवाईचे विशेषतः महिलांनी कौतुक केले आहे. गेवराई पोलिसांनी हातभट्टी तयार करणाऱ्या महिलेवर कारवाई करत २३९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी बुधवार रोजी सकाळी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या खांडवी तांडा येथील मंडाबाई लहू राठोड ही महिला अवैधरित्या हातभट्टी दारू तिच्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये काढत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यावरून गेवराई पोलिसांनी खांडवी येथील तुकानाईक तांडा येथे छापा टाकून हातभट्टी दारू उद्धवस्त केले आहे. पोलिसांनी महिलेला ताब्यात घेऊन तिच्यावर कारवाई करण्यात आली आहे. गेवराई पोलिसांनी अवैध दारू विक्रीविरोधात धडक मोहीम राबवत कारवाईचा बडगा उगारला आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मंडाबाई राठोड यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये गावठी हातभट्टी दारू तयार करत असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तिला ताब्यात घेतली आहे. ही पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश कोटकर, पोलीस हवालदार बागवान, पोलीस हवालदार पारदी, पोलीस शिपाई तर आणि खांडेकर यांनी यशस्वीपणे पार पाडली. अवैध दारू निर्मिती आणि विक्री विरूद्ध पोलिसांची ही मोहीम प्रभावीपणे सुरू असून अशा कारवाया यापुढेही कायम राहतील, असे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे परिसरातील दारू विकणाऱ्यांची धाबे दणाणले आहेत.

# पुणे विमान तळावरून १३ उड्डाणे रद्द

पुणे । प्रतिनिधी

'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानमधील काही शहरांवर केलेल्या एअर स्ट्राइकनंतर उत्तरेकडील काही महत्त्वाच्या विमानतळांवरील नागरी उड्डाण सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. यामुळे पुणे विमानतळावरून होणाऱ्या काही उड्डाणांवर परिणाम झाला असून, गुरुवारी विविध मार्गांवरील १३ विमान सेवा रद्द करण्यात आल्या आहेत.

पुणे विमानतळ प्रशासनाने यासंदर्भात दिलेल्या माहितीनुसार गुरुवारी (दि. ८) १३ मार्गांवरील इंडिगो, स्पाइसजेट विमानसेवा रद्द करण्यात आली आहे. या अचानक झालेल्या बदलामुळे अनेक प्रवासी प्रभावित झाले असून, त्यांना याची कल्पना देण्यासाठी विमानतळ प्रशासन, विमान कंपन्या व अन्य संबंधित यंत्रणा तत्पर झाल्या आहेत. प्रवाशांना त्यांच्या बुकिंगनुसार वैयक्तिकरीत्या संपर्क साधण्यात आला असून, घोषणा वाहिन्यांद्वारे, तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातूनही सतत अद्ययावत माहिती दिली जात आहे. प्रभावित प्रवाशांबाबत नागरी विमान वाहतूक महासंचालनालय यांच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्यात आले आहे. प्रवाशांना पूर्ण रकमेची परतफेड, किंवा अन्य पर्यायी उड्डाणांची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

सध्याची स्थिती ही पूर्णपणे

पान २ वर

# लष्करप्रमुखांना पुढील ३ वर्षांसाठी सर्वाधिकार, संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट जारी; गृहमंत्र्यांचीही तातडीची बैठक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत बैठकांचा जोर असून गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. दुसरीकडे संरक्षण मंत्रालयाने सैन्य दलाला महत्त्वाचे अधिकार दिले असून पुढील ३ वर्षांपर्यंत हे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तिनही सैन्य दलाच्या प्रमुखांसाठी संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली आहे. टेरिटोरियल आर्मी नियम १९४८ च्या नियम ३३ नुसार भूदल प्रमुखांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार, टेरिटोरियल आर्मीच्या सर्वच अधिकारी आणि सैनिकांना




आवश्यक सुरक्षा ड्यूटी नियमित सेना के समर्थन में सक्रिय सेवेत (एंबॉडीमेंट) बोलवू शकतात. सध्या ३२ टेरिटोरियल आर्मी इन्फँट्री बटालियनमधील १४ बटालियन देशाच्या विविध सैन्य दलांना, साउदर्न कमांड, ईस्टर्न कमांड, वेस्टर्न कमांड, सेंट्रल कमांड, नॉर्दर्न कमांड, साउथ-वेस्टर्न कमांड, अंदमान व निकोबार कमांड आणि आर्मी ट्रेनिंग कमांड येथे तैनात करण्यात येईल.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून गॅजेट अधिसूचना प्रसिद्ध करुन लष्करप्रमुखांना म्हणजेच सेनाध्यक्षांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सैन्य सेवेसंदर्भात ९ फेब्रुवारी २०२८ पर्यंत सेनाध्यक्षांकडे हे सर्वाधिकार असणार आहेत. त्यामुळे, भारत सरकारने पुढील ३ वर्षांसाठी सैन्य दलाच्या प्रमुखांना युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकार दिले आहेत. त्यानुर, टेरिटोरियल आर्मीतील अधिकाऱ्यांना बोलवण्याचे अधिकार सेनाध्यक्षांना असणार आहेत. तसेच, देशभरातील सर्व सैन्यसेवेतील अधिकारी, सैनिकांच्या ड्युटी लावण्याचे अधिकारही

पान २ वर

# मोफत गणवेशाचे ४३ लाख विद्यार्थी लाभार्थी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या तब्बल ४२ लाख ९७ हजार ७९० विद्यार्थ्यांना यंदा दोन मोफत गणवेशासह एक जोडी बूट आणि पायमोजे शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार आहे.

गणवेश, बूट, पायमोज्यांची एकूण संख्या समग्र शिक्षण मोहिमेने निश्चित केली आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून २५७ कोटी ८६ लाख ७४ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यातील सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील विविध राखीव घटकातील विद्यार्थ्यांना दोन गणवेश पुरविले जात होते; मात्र गेल्या वर्षीपासून सरसकट सर्वच विद्यार्थ्यांना एकच गणवेश दिला जात आहे.

यंदा गणवेशाची संख्या ४२ लाख ९७ हजार ७९० पर्यंत पोहोचली आहे. आता त्याबरोबर एक जोडी बूट आणि दोन पायमोजेही दिले जाणार असून त्यासाठी ७३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. गणवेश, बूट आणि पायमोजे खरेदी करून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीकडे सोपविली आहे.

**वेळेवर मिळणार गणवेश**

गेल्या वर्षी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला बचत गटांना गणवेश तयार करून देण्याचे कंत्राट दिले होते; मात्र त्यात दिरंगाई झाल्याने यंदा पूर्वीप्रमाणेच गणवेश पुरवठ्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समित्यांना सोपविण्यात आली आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी या गणवेशांच्या तयारीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडून आढावा घेतला जाणार आहे. वेळीच आर्थिक तरतूद केल्याने शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश मिळणार असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले.

**नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक विद्यार्थी**

मुंबई शहर आणि उपनगरांचा अपवाद वगळता राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सरकारी शाळांमध्ये गणवेश पुरविले जातील.सर्वाधिक दोन लाख ४४ हजार विद्यार्थी नाशिक जिल्ह्यातील शाळांमधील आहेत. त्याखालोखाल पुणे जिल्ह्यात एक लाख ५१ हजार ५२६ विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील.

# मराठवाडा अर्बन यांना कर्जापोटी दिलेला धनादेश न वटल्याने कर्जदारास बारा महिने कैद व दंडाची शिक्षा : रविंद्र वाघमारे

बीड । प्रतिनिधी



बीड येथील जयनाथ एकनाथ धांडे यांनी मराठवाडा अर्बन को.ऑप. क्रे. सोसा.लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते व सदर कर्जाचे हप्त्या पोटी जयनाथ एकनाथ धांडे यांनी वरील संस्थेस धनादेश दिला होता, परंतू खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने सदर धनादेश न वटता परत आला त्यामुळे वरील संस्थेने आरोपी जयनाथ एकनाथ धांडे याचे विरुध्द कलम १३८ एन. आय. क्ट प्रमाणे प्रकरण दाखल केले होते.

सदर प्रकरणात मराठवाडा अर्बन को. ऑप. क्रे. सोसा.लि. बीड च्या वतीने प्राधिकृत अधिकारी जालिंदर उत्तम गवळी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी भगवानराव देसाई यांनी दिलेली साक्ष व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करून, मा.५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांनी कर्जदार/आरोपी जयनाथ एकनाथ धांडे, रा. गणेश नगर, बीड यास १२ महिने कैदेची शिक्षा व नुकसान भरपाई पोटी रु.२,१०,२५०/– फिर्यादी संस्थेस देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम ३० दिवसांत न भरल्यास अतिरीक्त ६ महिने कैदेची शिक्षा देण्या बाबत आदेश केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी बँके तर्फे ॲड. रविंद्र एस. वाघमारे यांनी काम पाहिले, त्यांना संस्थेचे विधी सल्लागार डी.एम. डबडे यांनी मार्गदर्शन केले. मा. न्यायालयाचे वरील निकालामुळे संस्थेचे थकीत कर्जदार यांचेत खळबळ उडाली आहे.

## अशोक नागरगोजे यांना सढळ हातांनी मदत करा

फोन पै नंबर 7666613825

केज । प्रतिनिधी

अशोक बन्सी नागरगोजे बीड युवामतचे संपादक हे गेल्या आठ वर्षांपासून पॅरालिसिस या आजाराने ग्रस्त आहेत. बोलतांना जीभ तोंडातल्या तोंडात अडखळते. अनेक ठिकाणी औषध उपचार करूनही त्यांनी फरक पडलेला नसल्यामुळे मुंबईला १०/०५/२०२५ रोजी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तरी दानशूर नागरिकांना आवाहन करण्यात येते की आपल्या इच्छेनुसार जी काही मदत आपल्याकडून होईल ती करावी.

# आमदारांच्या सूचनेवरून चिखलीतील दारूअड्डा उद्ध्वस्त!

## परिसरातील सोसायटीधारकांना दिलासा, आमदार महेश लांडगे यांची पोलिसांना सूचना

पिंपरी । प्रतिनिधी

चिखली येथील होरायझन आणि लिगसी रिव्हरसाईड सोसायट्यांच्या मागे असलेल्या एका मोठ्या लेबर कॅम्पमध्ये देशी दारूचा बेकायदा अड्डा सुरू होता. जवळपास तीन हजाराहून अधिक मजुरांचे वास्तव्य असलेल्या या कॅम्पमध्ये बिनधास्तपणे चालणाऱ्या दारू विक्रीमुळे परिसरात सतत तणावाची व धोकादायक परिस्थिती निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी धडक कारवाई करत या अड्ड्यावर छापा टाकून तो उध्वस्त केला.

या कारवाईमुळे परिसरातील सोसायटीधारकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. बेकायदेशीर दारू अड्ड्यामुळे सतत वादविवाद, अपशब्द, महिलांवर अश्लील वर्तन आणि दगडफेकीसारख्या घटना घडत होत्या. अनेक वेळा मद्यधुंद अवस्थेतील मजूर सोसायटीच्या आवारात उपद्रव करत असल्याने महिलांसह लहान मुलांनाही घराबाहेर पडणे अवघड झाले होते.

**दारू विक्रीतून वाढलेली असुरक्षितता**

या लेबर कॅम्पमध्ये नियमितपणे देशी दारू विक्री होत होती. त्यामध्ये येणाऱ्या व ग्राहक म्हणून बसणाऱ्या मजुरांमुळे परिसरात गैरवर्तन व वादाचे प्रसंग वाढले. सोसायटींच्या सुरक्षारक्षकांकडूनही वारंवार पोलिसांकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र पोलिसांनी नुकतीच



तातडीने दखल घेऊन ही धडक कारवाई केली.

**बांगलादेशी घुसखोरीचा संशय**

या प्रकरणातील अधिक चिंताजनक बाब म्हणजे या लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर मजूर असल्याचा संशयही स्थानिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांनी पोलिसांकडे मागणी केली आहे की, या कॅम्पमधील प्रत्येक मजुराचे ओळखपत्र तपासले जावे आणि पोलीस सत्यापन केले जावे.

**पोलिसांकडून सर्च ऑपरेशनची मागणी**

रहिवाशांचे म्हणणे आहे की, या परिसरात असलेल्या हजारो मजुरांमध्ये कोण कोण आहे हे स्पष्ट नाही. त्यामुळे भविष्यात कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी याठिकाणी 'सर्च ऑपरेशन' राबवावे व विदेशी घुसखोर असल्यास त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी.

नागरी मध्यवस्तीत, सोसायटीच्या आवारात दारूचे दुकान असल्यास नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत राज्य विधिमंडळात निर्णय झाला. त्यानंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चार दारु दुकाने काही दिवसांपूर्वी 'सील' करण्यात आली होती. आता मजुरांच्या लेबर कॅम्पमध्ये बेकायदेशीर दारू अड्डा चालवला जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात आली. या लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शंका स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. त्याबाबतही पोलिसांमार्फत सर्च ऑपरेशन करण्याची मागणी केली आहे.

पान १ वरून...

## लष्करप्रमुखांना पुढील ३ वर्षांसाठी सर्वाधिकार

सेनाध्यक्षांना प्रदान झाले आहेत. यासंदर्भात ६ मे रोजी अधिसूचना काढण्यात आली व ८ मे ला गॅझेट करण्यात आले आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निमलष्करी दलांच्या प्रमुखांसोबत आज बैठक बोलावली आहे. आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली असून आरोग्य व्यवस्थेच्या सज्जतेवर चर्चा करण्यात आली आहे. तसेच, कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांचीही उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली असून देशातील अन्नधान्य पुरवठ्यावर चर्चा करण्यात आली आहे. भारताने संपूर्ण तयारीनिशी पाकिस्तानच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केल्याचं पाहायला मिळत आहे.

अमित शाहंसोबत बैठकीत कोणते निर्णय ?

आपत्कालीन कायद्याच्या अधिकारांचा वापर करण्याची राज्य सरकारांना मुभा देण्यात आली आहे.

राज्य सरकार आपत्कालीन अधिकारांचा वापर करून अत्यावश्यक वस्तूंच्या खरेदी करू शकतात.

सूत्रांच्या माहितीनुसार, गृहमंत्री शाह यांनी सीमावर्ती भागातील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे निर्देश दिले

अन्न, पाणी आणि इतर वैद्यकीय सुविधांची सोय सरकारकडून करण्यात येणार आहे.

गृहमंत्री शाह यांनी उखडच्चे डीजी रविंदर सिंह भट्टी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत आंतरराष्ट्रीय सीमा असलेल्या राज्यांतील विमानतळे आणि महत्त्वाच्या इमारतींच्या सुरक्षेची समीक्षा केली अधिकांश विमानतळे आणि शासकीय इमारतींची सुरक्षा उखडच कडे असल्याने सुरक्षा आढावा घेण्यात आला.

बीएसएफचे डीजी दलजीत सिंह आणि सीआरपीएफचे डीजी जीपी सिंह यांच्यासोबत सीमावर्ती भागातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला

बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजीत डोवाल, गृहसचिव गोविंद मोहन आणि इंटेलिजेंस ब्यूरोचे संचालक तपन डेका देखील उपस्थित होते.

## पुणे विमान तळावरून १३ उड्डाणे रद्द

संरक्षणविषयक गरजांमुळे उद्भवलेली असून, प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. आम्ही प्रवाशांच्या सोयीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. प्रवाशांनी त्यांच्या तिकीट बुकिंग संबंधित प्रश्नांसाठी थेट संबंधित विमान कंपन्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही विमानतळ प्रशासनाने केले आहे.

# सोमनाथ मंदिरासाठी पाकिस्तानातून आलेले सिंधू नदीचे पाणी नेहरू सरकारसाठी अडचणीचे का ठरले होते?

**२२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने इंडस वॉटर करार (सिंधु जलवाटप करार) स्थगित केला. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील पूर्वी झालेली तीन युद्धे किंवा सातत्याने असलेल्या वैरभावाच्या परिस्थितीतही हा करार टिकून होता. या कराराची अमलबजावणी स्थगित करण्यामागे बराच व्यापक अर्थ आहे. एकूणच भारताच्या इतिहासात आणि संस्कृतीत सिंधू नदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याच नदीच्या काठावर विकसित झालेल्या संस्कृतीला सिंधू संस्कृती किंवा इंडस व्हॅली सिव्हिलायझेशन (हडप्पा संस्कृती) असे नाव मिळाले आहे. या संस्कृतीचे ऐतिहासिक महत्त्व येथे वेगळे सांगायला नको. याशिवाय या नदीच्या पाण्याने आधुनिक भारतात एका महत्त्वाच्या घटनेत मोलाची भूमिका बजावली होती. ही घटना सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीशी संबंधित आहे. ही घटना भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वांची परीक्षा घेणारी ठरली होती.**



गुजरातमधील प्राचीन सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी करण्याची जबाबदारी घेतलेल्या ट्रस्टने जगभरातून वेगवेगळ्या ठिकाणाची माती, वनस्पती आणि पाणी गोळा करण्याचा निर्णय त्यावेळेस घेतला होता. या वस्तू मंदिरात अर्पण केल्या जाणार होत्या. या वस्तूंमध्ये पाकिस्तानातील सिंधू नदीचे १२ औंस पाणीही मागवण्यात आले होते. या संदर्भातील माहिती राष्ट्रीय अभिलेखागारात जतन केलेल्या कागदपत्रांमधून मिळते. याच दस्तऐवजांचा वापर करून इंडियन एक्स्प्रेसच्या हरिकिशन शर्मा यांनी या घटनेचा आढावा घेतला आहे.

**ऐतिहासिक पत्रव्यवहार**

मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी सिंधू नदीच्या पाण्याच्या मागणीसाठी २० फेब्रुवारी १९५१ रोजी नवानगरचे जामसाहिब यांनी पाकिस्तानातील भारताचे कार्यकारी उच्चायुक्त खुबचंद यांना पत्र लिहिले होते. या पत्रात त्यांनी म्हटले होते की, 'सोमनाथ मंदिराच्या समारंभासाठी केवळ भारतातूनच नव्हे तर जगभरातून पाणी, वनस्पती आणि माती मागवण्यात आल्याचे आम्हाला कळवण्यात आले आहे. पाकिस्तानातून आम्हाला सिंधू (इंडस) नदीचे १२ औंस पाणी हवे आहे. या पाण्याच्या पॅकेटवर स्पष्ट लेबल असावे आणि हे पॅकेट एअर मेलने पाठवावे. जेणेकरून ते मला उशिरात उशिरा १५ मार्च १९५१ (प्रतिष्ठापनेचा दिवस) पर्यंत प्राप्त होईल.'

**सिंधूचे पाणी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडे**

तत्काळ कारवाई करत, खुबचंद यांनी दोन आठवड्यांनी सिंधू नदीचे पाणी असलेले पॅकेट दिल्लीत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडे (चए–) पाठवले आणि साउथ ब्लॉकला कळवले. पाण्याचे हे पॅकेट पाठवण्यासंदर्भात खुबचंद यांनी चए– चे उपसचिव एस. के. बॅनर्जी यांना नवानगरचे जामसाहिब यांच्याबरोबर झालेल्या पत्रव्यवहाराचा दाखला देऊन पाणी हवाई टपालाद्वारे तत्काळ पाठवण्यास कळवले होते. किंबहुना त्यांनी त्याच दिवशी मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी शुभेच्छा देत पाणी पाठवल्याचे नवानगरच्या जाम साहिबांनाही कळवले. दिल्लीमध्ये, बॅनर्जी यांनी इंडस नदीच्या पाण्याचे पॅकेट अन्न व कृषीमंत्री असलेल्या के. एम. मुंशी यांच्याकडे पाठवले आणि जाम साहिबांना पत्र लिहून कळवले की, शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेसाठी तेच हे पाणी घेऊन जाणार आहेत.

**पाकिस्तानातील सिंधूच्या पाण्याला प्रसिद्धी नको?**

मात्र, कागदपत्रांमधून असे दिसून येते की, दिल्लीमध्ये सिंधूचे पाणी आल्यानंतर आठवडाभराने खुबचंद यांना पाकिस्तानमध्ये याचा कसा स्वीकार केला जाईल याची चिंता वाटू लागली. १९ मार्च १९५१ रोजी त्यांनी बॅनर्जी यांना लिहिले की, सिंधू (इंडस) नदीचे पाणी भारताच्या उच्चायुक्त कार्यालयाकडून पाकिस्तानातून पाठवले गेले किंवा ते समारंभासाठी वापरण्यात आले, अशी प्रसिद्धी कोणत्याच परिस्थितीत करू नये. त्यामुळे पाकिस्तानात यावर टीका होऊ शकते. बॅनर्जी यांनी २८ मार्च रोजी पत्राद्वारे खुबचंद यांची 'प्रसिद्धी देऊ नये' ही केलेली विनंती के. एम. मुंशींकडे पाठवली आणि त्याच वेळी कार्यवाह उच्चायुक्तांना विचारले, सोमनाथ मंदिरातील प्रतिष्ठापना पूजेत सिंधू नदीच्या पाण्याचा वापर करण्यात पाकिस्तानला नेमकी काय हरकत असू शकते?

**पाकिस्तानातील प्रसारमाध्यमांचे संभाव्य आक्षेप**

प्रश्नाचे उत्तर दोन दिवसांनी खुबचंद यांनी दिले. पाकिस्तान सरकारला याबाबत कोणतीही हरकत नाही. मात्र पाकिस्तानातील प्रसारमाध्यमांमध्ये काही प्रमाणात टीका होण्याची शक्यता आहे. ही टीका साधारणपणे अशा स्वरूपाची असू शकते, (अ) भारत स्वतःला धर्मनिरपेक्ष लोकशाही देश म्हणून मिरवतो, तरीही मुस्लिम आक्रमकाने उद्ध्वस्त केलेल्या मंदिराच्या पुनर्बांधणीसंबंधी मोठ्या थाटामाटात समारंभ करतो. (ब) भारताने फाळणीचा स्वीकार केलेला नाही. सिंधू आता भारतीय नदी राहिलेली नाही. ती पाकिस्तानच्या जीवनवाहिनीप्रमाणे आहे. सिंधू नदीच्या पाण्याचा वापर सूचित करतो की, भारत अजूनही या नदीला स्वतःच्या दृष्टिकोनातून पवित्र मानतो.

**आंतरराष्ट्रीय मते काय असतील?**

खुबचंद पुढे म्हणाले, अर्थातच हा आपल्या दृष्टीने ऐतिहासिक क्षण आहे की, आपण सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणी करतोय. मात्र, माझं वैयक्तिक मत असं आहे की, भारताच्या उच्चायुक्त कार्यालयाने सिंधू नदीचे पाणी पाठवल्याचा उल्लेख केला जाणे टाळावे. मात्र, समारंभात जगभरातील विविध ठिकाणांहून आणलेल्या पाणी व मातीबरोबर सिंधूचे पाणी वापरण्यात आले. याचा सौम्य उल्लेख करणे जर आवश्यक वाटले तर चालेल पाकिस्तानमधील परिणामापेक्षा महत्त्वाचे म्हणजे पाकिस्तानातील प्रसारमाध्यमे किंवा त्यांच्या प्रचारकांकडून व्यक्त केला जाणाऱ्या मतमतांतरांमुळे आंतरराष्ट्रीय मतमतांतरणावर होणारा प्रभाव अधिक महत्त्वाचा आहे.

**नेहरू सरकारमध्ये मतभेदाची ठिणगी**

शेवटी हे प्रकरण पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या पर्यंत पोहोचले. त्यांनी परराष्ट्र सचिव के. पी. एस. मेनन यांच्यामार्फत आपली नाराजी व्यक्त केली. (काँग्रेस नेते समर्थन करत असले तरी नेहरू कोणत्याही प्रकारे त्यांच्या सरकारचा सोमनाथ मंदिराच्या प्रतिष्ठापनेशी संबंध असावा याविरोधी होते). नेहरूंचा संदेश देताना मेनन यांनी २५ एप्रिल रोजी खुबचंद यांना लिहिले की, नवानगरच्या जाम साहिबांनी सिंधू नदीच्या पाण्याबाबत केलेली विनंती ही पंतप्रधानांच्या मान्यतेशिवायच आहे आणि भविष्यात अशा कोणत्याही विनंतीची अंमलबजावणी करण्यापूर्वी ती आमच्या निदर्शनास आणून द्यावी. ३० एप्रिल १९५१ रोजी खुबचंद यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला उत्तर दिले की, आम्ही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयामार्फत सिंधू नदीचे पाणी पाठवले, जेणेकरून जर आवश्यक असेल तर त्या विनंतीची योग्य छाननी केली जाऊ शकली असती. यासंदर्भात मी आधीच विनंती केली आहे की, उच्चायुक्त कार्यालयाने सोमनाथ मंदिराच्या प्रतिष्ठापनेसाठी सिंधू नदीचे पाणी पुरवल्याची कोणतीही प्रसिद्धी होऊ नये.

**भारतविरोधी प्रचारासाठीचे निमित्त**

खुबचंद यांची समारंभाच्या नकारात्मक प्रसिद्धीबाबतची चिंता योग्य ठरली. २१ मे १९५१ रोजी, माहिती विभागाचे उपमुख्य माहिती अधिकारी व्ही. आर. भट्ट यांनी तयार केलेल्या १२ पानी अहवालात परराष्ट्र मंत्रालयाला कळवले की, पाकिस्तानी गुजराती प्रसारमाध्यमांनी भारतावर धार्मिक पक्षपातीपणा आणि प्रतिशोध घेण्याचा आरोप करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध केल्या. भट्ट यांनी नमूद केले की, सोमनाथ समारंभ हा हिंदू आणि भारतविरोधी तीव्र प्रचारासाठी एक निमित्त ठरला होता.

# नावाप्रमाणेच सगळं बीड पण अंध:कारमय परिस्थितीत : पाटील

## आहे का कोणी वाली बीडला? कुणी पण या आणी टिकली मारून जा

बीड । प्रतिनिधी

शहराला पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन मध्ये सडलेली कुत्री आढळून आलीत, ही बातमी अफ़वा आहे अस मत नगरपालिका प्रशासनाने मांडले आहे, मग सकाळ पेपर ला आलेली न्युज आणी फोटो जल शुद्धीकरन केंद्रावर मोकाट कुत्र्यांचा वावर होतोय, असे निदर्सनास आले, मग ती पण अफ़वा आहे का, ईदगाह भागातील केंद्रावरिल प्रकार ही बातमी नुसती बातमी नसून बीड करांच्या जीवाशी खेळण्याचा विषय आहे या बाबतीत गांभीर्याने विचार झाला पाहिजे,



मुख्य अधिकाऱ्यांना जवाब विचारणार कोणी नाहीच ना, त्या मुळे पिण्याच्या पाईप लाईन मध्ये आज सडलेले कुत्रे निघतात उद्या डुक्कर पण निघतील, बीड च्या सर्व पदाधिकारांनी सरळ राजीनामा द्यावा कशाला नगरपालिकेचे अधिकारी म्हणून मिरवतात तुम्हाला जर बीड करांशी त्यांच्या जीवाशी काही घेणं देण नाही तर? बीड मध्ये विज नाही, पाणी नाही, कचऱ्याचा प्रश्न मार्गी नाही स्वछता नाही, सर्वांत घाण माझे शहर म्हणायची वेळ आली आहे प्रत्येक पदाधिकारीही सतेच्या नावाखालि स्वतः:ला मोठे करताय् आणी बीड च्या जनतेच्या जीवाशी खेळताय धिक्कार असो अश्या पद घेऊन बसलेल्या अधिकाऱ्यांचा, लोकांचा जीव गेला तरी चालेल पण आपले पगार बंद नाही झाले पाहिजे सर्व साधारण जनतेचे नगरपालिका अधिकाऱ्यांनी फोन नाही उचलायचे, नगर पालिकेत गेले असता मुख्य अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच असतात, मग आम्ही जायचे कुठे?

२१ एप्रिल पासून शहराला पाणी पुरवठा नाही, ज्यांच्या कडे पैसे आहेत ते लोक टँकर मागवतात, विकत पाणी घेताय, पण गरीब जनतेने काय करायचे, कुठे जायचे, ज्यांना एकवेळचे जेवण नाही त्यांनी रोज कसे पाणी विकत घ्यायचे निदान त्यांना तरी काही पर्यायी व्यवस्था नगरपालिका प्रशासनाने द्यावी, कळकळीची विनंती आहे, कचऱ्या मुळे शहरात रोगराई पसरते आहे, शहरातील काही मुख्य ठिकाणी जिथं घर, लहान मुलांचा, इतर लोकांचा सतत वावर आहे अशा ठिकाणी रस्त्याच्या दुथडी कचरा ओसंडत आहे, घाणच घाण, दुर्गंधी पसरलेली आहे, का या सर्व गोष्टींची गांभीर्याने दखल घेतली जात नाही, नळपट्टी, घरपट्टी, लाइटबील सर्व काही अगदी न विसरता नागरिकांकडून वसुल केले जाते, मग त्या बदल्यात आम्हाला काय मिळते? बीड ची जनता निर्जीव आहे का म्हणून इतका अत्याचार सुरु आहे,

बीड च्या प्रत्येकाने आपापल्या भागातील प्रश्न प्रशासनाकडे पोहचवा नहिं तर लवकरच एक मोठ आंदोलन करूया जेणेकरून काहीतरी मार्ग निघेल. अशी कळकळीची विनंती तेजस्विनी ग्रूप संस्थापिका सोनल पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

# सुकन्या मुंडे राजपत्रित अधिकारी वर्ग-१ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर नियुक्ती

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील तळेगाव येथील कै.सुधीर मुंडे यांची कन्या कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत राजपत्रित वर्ग १ सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, -RTO (-ssistant Regional Transport officer) या अत्यंत प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



यावेळी बोलताना कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे यांचे एसएससी पर्यंतच शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय गढी (बीड) येथे झाले तेव्हा पासूनच प्रशासकीय सेवेत जाऊन समाज सेवा करायची ठरवले होते. UPSC CIVIL services À¶m 4 mains परिक्षा दिल्या पन त्यात मुलाखतीसाठी पात्र होऊ शकले नाही. युपीएससीची तयारी करतानाचं सोबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा दिल्या सहा मुख्य परीक्षा आणि दोन मुलाखतीनंतर मला हे यश प्राप्त करता आले. या सगळ्या श्रेय माझी आजी, आजोबा, आई, मामांना जातं माझी एक्झाम फक्त माझी नसायची ती अख्या परिवाराची असायची जेव्हा जेव्हा अपयश आले तितक्या वेळा त्यांनी पुन्हा मेहनत करण्याची ताकद दिली.

त्यांच्या सपोर्ट शिवाय हे यश अशक्य होतं. त्यामुळे हे यश माझं आहे त्या पेक्षा कित्येकतरी पटीनं माझ्या फॅमिलीचे यश आहे. हा प्रवास खरंच सोपा नव्हता.पन सातत्य, संयम, कठीण परिश्रम आणि घरच्यांचा स्पोर्ट्स आणि आशिर्वादामुळेच सोपा होऊ शकला. या यशाच्या निमित्ताने मी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याच्या सर्व विद्यार्थ्यांना एकच सांगू शकते स्वप्न मोठ पहा. ते मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा. आणि नेहमी लक्षात ठेवा की शांततेच्या काळात जितका अधिक घाम गाळाल, युद्धाच्या काळात तितकंच कमी रक्त सांडाल, स्वतः:वर विश्वास ठेवा प्रयत्न थांबू नका यश नक्की मिळेल. या प्रवासात ज्यांनी मला अविरत साथ दिली माझ्यावर विश्वास ठेवला आणि मला मार्गदर्शन केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.



वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त राजपुत समाज बांधवांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमास सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे व शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी उपस्थित राहून अभिवादन केले. यावेळी झुंजार धांडे, डॉ.राजीव काळे, सुरेश तात्या शेटे, मुकूंद भालेकर, किशोर राऊत, मधुकर धांडे, संध्याताई राजपूत, मीराताई गांधले, आयोजक जयसिंग चुगडे, विक्रांत हजारे, राणा चव्हाण, प्रकाशसिंग ठाकूर, रतन गुजर, विक्रमसिंग कपूर यांच्या सह रजपूत समाज बांधव व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिवाचीवाडी येथे कॉमन सर्विस सेंटरचे उद्घाटन संपन्न

केज । प्रतिनिधी

दि.०७ मे २०२५ रोजी केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे केंद्रिय योजनेतुन नाबार्डच्या पुढाकाराने प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेचे संगणकीकरण प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र शासनाने सहकार खात्या मधुन संगणकाचा पूर्ण संच सेवा सहकारी सोसायटी जिवाचीवाडी यांना मिळताच संस्थेने कॉमनसर्विस सेंटरचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. बीड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था महादेव शिंदे यांच्या आदेशा वरून केज सहकारी संस्थाचे सहाय्यक निबंधक महादेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज कार्यालयीन अधीक्षक श्रीमती माल्टी वहावळे यांच्या शुभहस्ते आणि संस्थेचे सहाय्यक सहकारी अधिकारी कोंडीबा मुंडे यांच्या समवेत कार्यक्रम संपन्न झाला.





प्रथमता मान्यवरांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोसायटीचे सदस्य सत्यनारायण चौरे यांनी करताना सांगीतले की, केज तालुक्यातील पहिली संस्था जिवाचीवाडीची आहे. यामुळे कॉमन सर्विस सेंटर चालु करून ग्रामस्थांना अल्पशा अत्यंत कमी दरात ऑनलाईनची कामे करून व विविध दाखले, प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याचा मानस संस्थेचा असुन सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, बालाप्रसाद श्रीरंगदास भुतडा यांनी विशेष उल्लेखनीय कार्य करत केज तालुक्यात विशिष्ट वेगळा उपक्रम राबवून शेतकऱ्यांचा आर्थीक भार कमी केल्याने ग्रामस्थ व तालुका परीसरात चर्चा होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोसायटीचे जेष्ठ संचालक तुळशीराम तोंडे होते. कार्यक्रमास संजय कुटे, दिपक काळे,गोकुळ सारूक,राजेंद्र तांदळे, सुभाष सारूक,चांगदेव चौरे,संगणक चालक नितीन फुंदे,युवराज चौरे इत्यादी ग्रामस्थ संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या केज तालुक्याची कार्यकारिणी जाहीर



केज । प्रतिनिधी

भारत सरकार मान्यता प्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ केज तालुक्याची कार्यकारणी जाहीर झाली असून राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांच्या आदेशाने तथा मराठवाडा कार्याध्यक्ष दशरथ रोडे याच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या केज तालुक्याच्या नव्या कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. या नव्याने गठीत झालेल्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी अजय भांगे यांची फेरनिवड करण्यात आली असुन उपाध्यक्षपदी प्रखर लेखनीचे सुदेश दादा शिरसट यांची नियुक्ती तर संघटक म्हणून अजमोदीन इनामदार यांची आणि दै.जननेताचे संपादक सनी शेख यांची तालुका सचिवपदी फेरनिवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे केज तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य केले जाईल, असा विश्वास दै. वादळ वार्तचे संपादक तथा नवनिर्वाचीत केज तालुकाध्यक्ष अजय भांगे यांनी व्यक्त केला आहे. या निवडीमुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# बीड येथून राशन दुकानातील ३०० क्विंटल तांदूळ काळया बाजारात जाताना पकडलेला गुन्हा हायकोर्ट मध्ये रद्द

बीड । प्रतिनिधी

अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या गुप्त माहिती द्वारे बीड येथून निघालेला आणि कॅन्टोन्मेंट येथे पकडण्यात आलेला सोळा चाकी ट्रक मध्ये मिळून आलेल्या तीनशे क्विंटल तांदूळ जप्त करून महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाश तोतला व त्यांच्या मुलावरील गुन्हा व दोषारोप पत्र माननीय हायकोर्ट औरंगाबाद मध्ये रद्द करण्यात आले.

प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना क्राईम ब्रँच यांच्याकडून अशी गुप्त माहिती मिळाली की बीड येथून एक सोळा चाकी ट्रक हा राशन दुकानातील तांदूळ घेऊन काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे जात आहे या माहितीवरून अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी सापळा रुचून सदरील ट्रक हा कॅन्टोन्मेंट येथे पकडला व तपासणी केली असता सदरील ट्रक मध्ये सहाशे गोण्या तांदूळ असे एकूण ३०० क्विंटल मिळून आला सदरील तांदळाची माहिती ड्रायव्हरला विचारले असता त्याने सांगितले की सदरील तांदूळ हा महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाशजी तोतला यांनी राशन दुकानातील तांदूळ घेऊन प्रोसेस करून सदर तांदूळ हा काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे नवाकार उद्योग येथे पाठवलेला आहे त्याचबरोबर सदरील तांदळाचे पावतीची मागणी केली असता ती ड्रायव्हर कडे मिळून न आल्यामुळे अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी प्रकाश तोतला व त्यांचा मुलगा व ड्रायव्हर व इतर एक जनावर जीवनावश्यक वस्तू कायद्याचे अधिनियम तीन व सात नुसार गुन्हा दाखल केला होता.

सदरील गुन्हा रद्द करण्यासाठी प्रकाश तोतला व त्यांचे मुलगा यांनी एडवोकेट श्रीकांत जी कवडे यांच्यामार्फत माननीय हायकोर्ट औरंगाबाद येथे फौजदारी अर्ज दाखल केला होता सदरील फौजदारी अर्जावर सुनावणी होताना श्री तोतला यांचे वकील कवडे यांनी असे नमूद केले की पोलिसांनी चुकीच्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल केलेला आहे सदरील तांदूळ हा काळया बाजारात जात आहे तसेच सदरील तांदूळ हा राशन दुकानाचा आहे याचा कुठलाही पुरावा पोलीस गुन्ह्यामध्ये तसेच दोषारोप पत्रामध्ये सिद्ध करू शकलेले नाहीत व चौकशी अंती त्यांच्याकडे कुठलाही पुरावा दिसून येत नाही हा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय हायकोर्टाने श्री प्रकाश तोतला व पवन तोतला बीड यांच्यावरील अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा तसेच दोषारोपपत्र आरोपीचे वकील ड .श्रीकांत. जी .कवडे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने रद्द केले सदर प्रकरणाकडे सर्व मराठवाड्याचे लक्ष लागलेले होते त्यामुळे ड. श्रीकांत कवडे यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# ओळख पटवण्याचे नागरिकांना आवाहन

बीड । प्रतिनिधी



कु.आरती ही रंगाने सावळी असून चेहरा गोलाकार आहे, व उंची १२४.ला आहे. ती शरीराने सडपातळ आहे तिला मा. बालकल्याण समिती बीड, यांच्या आदेशान्वये दिनांक ०६/०४/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता.शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे. कु.सिद्धी संगीता ओहळ ही रंगाने सावळी असून चेहरा लंबगोलाकार आहे, व उंची १४५ ला आहे. ती शरीराने सडपातळ आहे तिला मा. बालकल्याण समिती बीड, यांच्या आदेशान्वये दिनांक २८/१०/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता.शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे. या बालिकांवरती हक्क दाखवणारे माता पिता, पालक व इतर नातेवाईक यांनी खालील पत्ता व दिलेल्या संपर्क क्रमांकावर बातमी प्रसिध्दं झाल्यापासून ३० दिवसाच्या आत संपर्क साधावा हि विनंती संपर्क करा. मंगेश जाधव (जिल्हा बाल संरक्षण अधिकारी), बीड मो.नं.९९२१७३९००३, कावेरी नागरगोजे (अधीक्षक) शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता.शिरूर कासार जि. बीड मो.नं.९४२१२८२३५९

# अहिल्यादेवी होळकरांच्या स्मरणार्थ राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण व्हावे : बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात यावर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होते आहे. राज्य सरकारनेही त्यांना अभिवादन करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठक त्यांच्या थेट जन्मस्थळी म्हणजे चौंडी येथे घेतली आहे. या बैठकीत अहिल्यादेवी यांच्या जन्मस्थळी विविध विकास योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल राज्य सरकारचे खुप खुप आभार पण एक खंत यानिमित्ताने सरकारने महाराष्ट्र राज्यातील एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम हाती घ्यायला हवाच असे मत साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

अहिल्यादेवी या एकल महिला होत्या. एक एकल महिला किती मोठे कर्तृत्व गाजवू शकते याचे त्या वस्तुपाठ आहेत.एकल महिलांसाठी त्या प्रेरक आहेत. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ राज्यात एकल महिला पुनर्वसन धोरण व्हावे. महाराष्ट्रात आज विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे. या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी, सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांचे स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल.

एकल महिलांची संख्या किती असू शकते ?

देशाच्या २००१ च्या जनगणनेत एकल महिला ५ कोटी तर २०११ साली ७ कोटी ३० लाख होत्या. महाराष्ट्रात आज ही संख्या प्रचंड असू शकते याचा एक पुरावा देत आहे असे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले. अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान ज्या अहिल्यानगर जिल्ह्यात आहे. त्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर एकल महिलांचे सर्वेक्षण केले. तेव्हा फक्त ग्रामपंचायत स्तरावर या एकल महिलांची संख्या १ लाख ७ हजार निघाली. त्यात १५ तालुक्यातील नगरपंचायत,नगरपालिका, महापालिका ही संख्या मिळवली तर ती संख्या २ लाख असू शकते...ही एका जिल्ह्याची स्थिती आहे.

जर एका जिल्ह्यात दोन लाख एकल महिला असतील तर राज्यात ३६ जिल्ह्यात एकल महिलांची संख्या ७० लाखापेक्षा जास्त असू शकते आणि पुणे,मुंबई,नागपूर,संभाजीनगर सारख्या मोठ्या शहरातील मोठी संख्या बघता एकूण संख्या ८० लाखापेक्षा जास्त असू शकते. त्यांच्यावर अवलंबून असणारी दोन मुले धरली तर राज्याच्या लोकसंख्येत ही खूप लक्षणीय असेल. कोरोनात महाराष्ट्रात झालेले सर्वात जास्त मृत्यू आणि दारूने गावोगावी मोठ्या संख्येने मरणारे तरुण बघता ही एकल महिलांची संख्या खूप वाढली आहे. त्यामुळे एकल महिलांच्यासाठी धोरण तयार करण्यासाठी शासनाने सुरुवात म्हणून राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण करून अहिल्यादेवी यांच्या स्मरणार्थ भरीव आर्थिक तरतूद करावी.

हे सर्वेक्षण करण्यासाठी फार खर्च ही येणार नाही. ग्रामपंचायत क्षेत्रात त्या छोट्या गावात ग्रामसेवक,अंगणवाडी सेविका,आशा सेविका यांच्याकडे गावातील एकल महिला माहिती असतेच. ती फक्त वयोगटानुसार संकलन करायची आहे. शहरी भागात वॉर्ड ऑफिसर ,अंगणवाडी व स्वयंसेवी संस्था मदत करू शकतील व एकल महिलाना नोंदणीसाठी ऑनलाईन र्ॉ ( ॲप ) बनवून त्या ॲपद्वारे हि नोंदणी करता येईल. त्यामुळे हा कमी खर्चात होणारा सर्व्हे आहे.

आज आपल्या आजुबाजूला असलेल्या या लाखो भगिनी असूनही लक्षात येत नाहीत. अदृश्य असलेला हा प्रश्न संख्या पुढे आली की दृष्यमान होईल व सरकार व समाज यांच्यासाठी नक्कीच काही करू शकेल. त्यामुळे अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्त एकल महिलांच्या प्रश्नावर सर्वेक्षणाची घोषणा सरकारने करून कृति कार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी साऊ एकल महिला समिती करत आहे . तरी राज्य सरकारने तातडीने पुढील कृती आराखडा तयार करावा असे आवाहन बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.



अहिल्यानगर शहराचे लोकप्रिय माजी आमदार अरुण काका जगताप यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे सांत्वन यावेळी आमदार संग्राम भैयाजगताप व जिजाऊ ब्रिगेडच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई गिरहे व पती डॉक्टर बाळासाहेब गिरहे. (छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी)

# जिल्हाधिकारी साहेब कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा कधी बंद करणार

## ■ गाळमाफियांचा नंगानाच सुरुच ■ शासनाचा महसूल बुडत आहे ■ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट द्यावी

धारुर | प्रतिनिधी

जिल्हाधिकारी साहेब कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा कधी बंद करणार व शेतकऱ्यांसाठी हा गाळ कधी खुला करणार असा सवाल येथील शेतकरी करत आहेत. धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात आहे. यामुळे गाळ माफियांचा नंगानाच सुरूच आहे. तरी जिल्हाधिकारी यांनी कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपशाला अचानक भेट देऊन याची पाहणी करून शहानिशा करावी.

हा गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. तरी इथे एक महसुलचा कर्मचाऱ्याची नेमणूक करुन हा गाळ किती शेतकऱ्यांना दिला जातो व किती वीट भट्टी धारकांना दिला जातो व किती टिप्पर जातात व किती रॉयल्टी भरतात त्याची



नोंद घेण्यासाठी एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ५मे रोजी गाळ मुक्तधरण व गाळयुक्त शिवार या शासनाच्या योजनेच्या रथाचे उद्घाटन करून गावागावात जाऊन याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी जात आहे.धुनकवाड येथे ही या रथाला आणुन या रथाच्या माध्यमातून हा कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा थांबवावा व हा गाळ वीटभट्टी धारकांच्या घशात जात असलेला गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करून देण्यात यावा यामुळे शेतकरी वंचित राहणार नाहीत अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतःहा या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे लक्ष देऊन अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धडा शिकवावा व शेतकऱ्यांचे नंदनवन करण्यासाठी शेतकऱ्यांना हा गाळ खुला करून देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा व एकदा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या कुंडलिका धरणातील गाळ उपशाला अचानक भेट देऊन याची पाहणी करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान**

कुंडलिका धरणातील हा अवैध गाळ उपसा विट भट्टी धारकांना दिला जात असुन हा गाळ उपसाची मोठ्या प्रमाणात टिप्परची वाहातुक सुरू असुन हा गाळ घेऊन जात असताना या धुळीने शेतकऱ्यांच्या पिकांवर गाळाचा थर साचत असून शेतकऱ्यांना आपल्या पिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.




**जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट द्यावी**

बीड जिल्ह्याला कर्तव्यदक्ष असे जिल्हाधिकारी लाभले आहेत परंतु तालुका प्रशासन यांच्या कृपाशीर्वादाने कुंडलिका धरणातील गाळमाफी यांच्या संगनमताने अवैध गाळ उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असून या कुंडलिका धरणातील गाळ उपशाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट देऊन या तलावातील अवैध गाळ उपशाची शहानिशा करून पाहणी करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**अधिकाऱ्यांच्या मिलिभगतमुळे लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे**

तालुका प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी यांची या गाळमाफी यांच्या सोबतची मिलीभगत असल्याने शासनाला हेच अधिकारी व कर्मचारी फसवत असून किती महसूल मिळतो व नियमानुसार किती गाळाची वाहतूक होते याचा हिशोब नसल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल यामुळे बुडत आहे.

**कर्मचाऱ्याची नेमणूक करावी**

हे गाळ माफिया नियमानुसार दररोज किती रॉयल्टी भरतात व किती टिप्पर अवैध गाळ वाहतूक करतात यातील गाळ हा शेतकऱ्यांसाठी किती प्रमाणात जातो का वीटभट्टी धारकच त्यावर डल्ला मारतात म्हणून जेवढी रॉयल्टी भरली आहे तेवढाच गाळ उपसा होतोय का यासाठी एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अशी मागणी ही शेतकरी वर्गातून होत आहे.

---

# सायंकाळी पांढऱ्या रंगाची इनिव्हा आली अन उचलले परळीतून रस्त्यावरून एकाचे अपहरण

परळी (वै.) | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अपहरणाच्या घटना गेल्या काही महिन्यापासून गाजत असतानाच आता परळीतील एका नागरिकाचे भर रस्त्यावरून उचलून घेऊन जात अपहरण झाल्याची घटना आज सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी रात्री उशिरा परळीच्या संभाजीनगर पोलिसात अकरा वाजून १७ मिनिटांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने एकच खळबळ उडवली आहे.

याबाबत पोलीस सूत्राकडून प्राप्त अधिक माहितीनुसार दिनांक ७/५/२०२५ रोजी सायंकाळी ४५ वाजण्याच्या सुमारास राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक ते गणेश पार रोड या मुख्य रस्त्यावरील एका हॉटेल जवळून अपर्णाची घटना घडली आहे. यातील पीडित इसम नामे शेख आजमेद अहमद शेख वय ३५ वर्षे रा. बरकत नगर परळी वैजनाथ यास अनोळखी पाच ते सहा लोकांनी पकडून रोडवर उभ्या केलेल्या पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा गाडीमध्ये बळजबरीने गाडीमध्ये टाकून त्याचे अपहरण करून घेऊन गेले आहेत.



अशी फिर्याद शेख जमीर शेख अमीर रा. खोदणे नगर परळी वै. यांनी दिली आहे. यावरून आरोपी अनोळखी इसम पाच ते सहा जनाविरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर परळी वैजनाथ येथे गुरंन. ९६/२०२५ कलम (१४०)(३) बी एम एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनी शिंदे हे करीत आहेत.

---

# जिल्हाधिकाऱ्यांचा बिनकामाचा जनता दरबार

## पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी म्हणाले हा तर जिल्हाधिकाऱ्यांचा बिनकामाचा जनता दरबार

बीड | प्रतिनिधी

जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातात. वांझोटा जनता दरबार म्हणण्याचे कारण म्हणजे जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना (फोनवर) बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले तर नागरीकांचे समाधान होईल.

आता कालची गोष्ट पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील १० शेतकरी दि.०७ बुधवार रोजी भाड्याने गाडी करून पवनचक्की




कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली. त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली. जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि त्यांना वाटं लावले. आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले????? त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार म्हणाले.

---

# आष्टीचे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय वाऱ्यावर

## एक शिपाई हजर एक कनिष्ठ अभियंता दौऱ्यावर इतर अधिकारी मात्र गायब

आष्टी | प्रतिनिधी

आष्टी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयातील एक शिपाई सोडला तर इतर सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकारी गैरहजर असल्याचे सोमवार दि.५ एप्रिल रोजी दिसून आले. सकाळी या कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच्या असल्याचे पाहायला मिळाले.

राष्ट्रीय येथील पंचायत समितीमध्ये आष्टी तालुका ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यालय आहे. या कार्यालयामार्फत आष्टी तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या योजना राबवल्या जातात. सध्या उन्हाळी परिस्थिती असल्याने आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावांमध्ये पाणीटंच निर्माण झालेली आहे असे असतानाही हे कार्यालय मात्र गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. केंद्र सरकारचे महत्वकांक्षी योजना असलेले जल जीवन मिशन हे देखील योजना या कार्यालयाच्या अनागोंदी कारभारामुळे रखडले असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान आष्टी येथील मनसेचे कैलास दरेकर यांनी या कार्यालयाला सोमवार दिनांक पाच एप्रिल रोज सकाळी ११ वाजता भेट दिली असता या कार्यालयात एक शिपाई सोडता इतर सर्व अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे दिसून आली त्यामुळे राष्ट्रीय येथील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय वाऱ्यावर असल्याचे दिसून आले.

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयामध्ये एकूण नऊ कर्मचारी अधिकारी आहेत. यामध्ये एक उप अभियंता, पाच कनिष्ठ अभियंता, एक कनिष्ठ सहाय्यक तर दोन शिपाई आहेत. सोमवार दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास या कार्यालयात फक्त एक शिपाई उपस्थित होता तर ही तर सर्व कर्मचारी गैरहजर होते. यापैकी जे. एस.भवर हे डोईठाण येथे साइटवर गेल्याचे येथील नोंदवहीत नमूद केलेले होते इतर अधिकाऱ्याबाबत मात्र या नोंदवहीत काहीच आढळून आले नाही.

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयाचे उपा अभियंता गोविंद भुजबळ यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन न उचलल्याने संपर्क होऊ शकला नाही त्यामुळे त्यांची बाजू कळाले नाही.

दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

आष्टी येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयातील अनेक अधिकारी हे सतत गैरहजर असतात. साइटवर गेल्याचे इतर ठिकाणी जातात त्याचबरोबर येथील कार्यालयातील नोंदवहीत ते नोंद करत नाहीत. सध्या उन्हाळा असल्याने तालुक्यात पाणीटंचाई निर्माण झालेली आहे असे असतानाही या कार्यालयातील अधिकारी सतत गैरहजर राहतात किंवा उशिरा येतात त्यामुळे अशा अधिकारी कर्मचाऱ्यांवर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करावी.

**– कैलास दरेकर, मनसे जिल्हाध्यक्ष**

---

# गांजा प्रकरणातील आरोपींना दहा तारखेपर्यंत पोलीस कोठडी

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, उपनिरीक्षक स्वप्निल कोळी याचे परिसरात कोर्तुक

तलवाडा | प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धमसला तलवाडा पोलीस स्टेशनच्या हार्दिक असलेल्या गावांमध्ये पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार गावामध्ये बारा लाख रुपयांचा गाजा आढळून आला असून अशी गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्या ठिकाणी तात्काळ साहेब पोलीस निरीक्षक सोमनाथ नगके, तसेच उप पोलीस निरीक्षक स्वप्निल कोळी त्याच्या टीम ने तात्काळ घटणा स्थली जाऊन त्या ठिकाणाहून ११ लाख ६८ हजार ३०० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला सदरील आरोपींना गेवराई येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता दहा तारखेपर्यंत पोलीस कोठडी सोनवण्यात आली असून या कारवाई ने तलवाडा पोलिसांच्या कोरतुक होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हार्दिक असलेले अर्धमसला या गावात तलवाडा पोलीसाना गोपनीय माहिती मिळाली की, अर्धा



मसला गावात शेतात एका पाण्याच्या टाकीत गाजा असून त्याची तस्करी होत आहे मग पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांनी,उप पोलीस निरीक्षक स्वप्निल कोळी व त्यांच्या टीम ने तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तब्बल ४७ किलो गांजाची पाकीट आढळून आली त्याची एकूण किंमत ११ लाख ६८ हजार ३०० रुपये एवढी असून या गांजाची तस्कर करणारा आरोपी गफार अमीन पठाण वय ४० वर्ष रा हिरापुर ता गेवराई याला तात्काळ अटक केली होती काल त्याला कोर्टात हजर केले असून १० तारखे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असुन ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, उप पोलीस निरीक्षक स्वप्नील कोळी, पोलीस निरीक्षक सुनील बोडखे, गोपनीय शाखेचे विठल चव्हाण, सहाय्यक फोजदार विठ्ठल राठेड, पोलीस हवालदार नारायण काकडे, पोलीस नाईक सुग्रीव रूपणर आदींनी केली असून सोमनाथ नरके यांच्या फिर्यादी वरून कलम ८(क) २० (ब) आय (क) नुसार करवाई करण्यात आली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT